# ZILLA PARISHAD NASHIK




## Monthly Newsletter December 2025

# मनोगत...

जिल्हा परिषद नाशिकच्या डिसेंबर या मासिक अहवालाचे सादरीकरण करताना मला अत्यंत आनंद होत आहे. आपल्या सर्वांच्या सहभागातून आपण एक सक्षम, सर्वसमावेशक आणि प्रगतिशील नाशिक घडवण्यासाठी सातत्याने करत असलेल्या प्रयत्नांचे हे संक्षिप्त प्रतिबिंब आहे. खऱ्या अर्थाने विकास तेव्हाच घडतो जेव्हा तो शेवटच्या घटकापर्यंत पोहोचतो आणि त्याचा दीर्घकालीन परिणाम दिसून येतो ही आमची भूमिका आमच्या प्रत्येक उपक्रमामध्ये दिसून येते.

गेल्या महिन्यात लोकाभिमुख सेवा अधिक सक्षम बनवणे, शिक्षणाची गुणवत्ता वाढवणे, महिलांना सक्षम करणे, आरोग्य सेवा सुधारणा व ग्रामीण प्रशासनाला वेग देणे या क्षेत्रांवर विशेष लक्ष केंद्रित केले. स्वावलंबी नाशिक मोहिमेअंतर्गत दिव्यांग व्यक्तींना UDID कार्डाची सुलभ उपलब्धता, विद्यार्थ्यांसाठी राबवण्यात येणारा ‘चला पुस्तक वाचूया : 100 दिवस वाचन चळवळ उपक्रम तसेच बाल विकास प्रकल्प अधिकारी व पर्यवेक्षिका यांच्या एकदिवसीय प्रशिक्षण हे उपक्रम राबवले जात आहेत .

हे सर्व उपक्रम जिल्हा परिषद प्रशासनातील गाव पातळीवर काम करणारे सर्व कर्मचारी, नागरी संस्था, CSR संस्था आणि सर्वसामान्य नागरिक यांच्या सामूहिक ऊर्जेचे फलित आहे. आपल्या विश्वास आणि सहकार्याबद्दल मी मनापासून आभार व्यक्त करतो. आगामी काळातही पारदर्शक प्रशासन, तंत्रज्ञानाधारित सेवा वितरण, आणि प्रत्येक व्यक्तीला सन्मान, समता व सक्षमीकरण देणारा विकास हे ध्येय घेऊन जिल्ह्याच्या विकासास तत्पर राहू.

हा मासिक अहवाल आपल्याला ग्रामीण भागातील परिवर्तनात्मक कामाशी अधिक जोडेल आणि प्रेरणा देईल, अशी मला खात्री वाटते. चला, आपण सर्वांनी नव्या ऊर्जा आणि सामूहिक जबाबदारीने प्रगतीच्या या प्रवासात पुढे वाटचाल करूया.

**मा. मुख्य कार्यकारी अधिकारी**
**श्री. ओमकार नीलम मधुकर पवार (भा. प्र.से)**



# Table of *Content*


1 दिव्यांग दिनानिमित्त जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी ओमकार पवार यांची अनोखी भेट

2 बाल विकास प्रकल्प अधिकारी व पर्यवेक्षिका यांच्या एकदिवसीय प्रशिक्षण कार्यक्रम

3 सीईओं'ची शाळेस भेट विद्यार्थ्यांसोबत मध्यान्ह भोजन

4 नाशिक जिल्ह्यात 'चला पुस्तक वाचूया : १०० दिवस वाचन चळवळी'चा शुभारंभ

5 जिल्हा परिषदस्तरीय पेन्शन अदालत आता पंचायत समितीस्तरावरही

6 स्पेलिंग बी वर्ड बँक' व लोगोचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या हस्ते अनावरण

7 विनोबा ॲपमध्ये उत्कृष्ट काम करणाऱ्या शिक्षकांचा 'पोस्ट ऑफ दी मंथ' म्हणून गौरव

# ZILLA PARISHAD NASHIK | DEC 2025

## December Major HIGHLIGHTS

We as a Zilla Parishad Nashik, love to share the key news, achievements and highlights of the month. This newsletter will help to see the major works done by the ZP Nashik in the December month.





### दिव्यांग दिनानिमित्त जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी ओमकार पवार यांची अनोखी भेट

जागतिक दिव्यांग दिनानिमित्त जिल्हा परिषद नाशिकचे मुख्य कार्यकारी अधिकारी ओमकार पवार यांनी विविध प्रशासकीय विभागांना भेट देऊन दिव्यांग कर्मचाऱ्यांशी संवाद साधला.
यावेळी त्यांनी कर्मचाऱ्यांच्या अडचणी जाणून घेत आवश्यक सुविधा तात्काळ उपलब्ध करून देण्याचे निर्देश दिले तसेच दिव्यांग कर्मचाऱ्यांना पुस्तक भेट देऊन शुभेच्छा दिल्या.
या उपक्रमामुळे दिव्यांग कर्मचाऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.



### बाल विकास प्रकल्प अधिकारी व पर्यवेक्षिका यांच्या एकदिवसीय प्रशिक्षण कार्यक्रम

महिला व बालविकास विभाग, जिल्हा परिषद नाशिक यांच्या वतीने बाल विकास प्रकल्प अधिकारी व पर्यवेक्षिका यांचे एकदिवसीय प्रशिक्षण संपन्न झाले.
या प्रशिक्षणात विविध योजनांचे तांत्रिक मार्गदर्शन देण्यात आले तसेच एकल महिला परिचय मेळाव्याच्या नियोजनाबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी ओमकार पवार यांनी आढावा घेतला. प्रभावी समन्वय, नावनोंदणी व प्रचार-प्रसाराबाबत सर्व बाल विकास प्रकल्पांना दिशा देण्यात आली.

### 'सीईओं'ची शाळेस भेट विद्यार्थ्यांसोबत मध्यान्ह भोजन

मुख्य कार्यकारी अधिकारी ओमकार पवार यांनी कोणतीही पूर्वसूचना न देता जिल्हा परिषद शाळा, घोटी मुले 1 येथे अचानक भेट दिली.
यावेळी त्यांनी शैक्षणिक गुणवत्ता, शालेय पोषण आहार व सहशालेय उपक्रमांची पाहणी करत विद्यार्थ्यांसोबत पोषण आहाराचा आस्वाद घेतला. डिजिटल इंटरॅक्टिव्ह बोर्डवर विद्यार्थ्यांनी आत्मविश्वासाने गणिताची उदाहरणे सोडवली असून विद्यार्थ्यांचा उत्साह व शिक्षकांच्या अध्यापन पद्धतीबाबत त्यांनी समाधान व्यक्त केले.





## नाशिक जिल्ह्यात ‘चला पुस्तक वाचूया : 100 दिवस वाचन चळवळी’चा शुभारंभ

विद्यार्थ्यांमध्ये अवांतर वाचनाची गोडी निर्माण करून वाचन कौशल्य वाढविण्याच्या उद्देशाने नाशिक जिल्हा परिषदेच्या ‘चला पुस्तक वाचूया : 100 दिवस वाचन चळवळी’चा शुभारंभ मुख्य कार्यकारी अधिकारी ओमकार पवार यांच्या हस्ते झाला. ही चळवळ सर्व विभागांच्या समन्वयातून राबविण्यात येणार असून प्रत्येक शाळेत ‘वाचन कोपरा’ व गावपातळीवर ‘चावडी वाचन’ उपक्रम राबविण्याचे निर्देश देण्यात आले. दि. 17 डिसेंबर 2025 ते 31 मार्च 2026 या कालावधीत ही मोहीम राबवून नाशिक जिल्हा ‘वाचनस्नेही जिल्हा’ म्हणून विकसित करण्याचा प्रशासनाचा मानस आहे.

‘चला पुस्तक वाचूया : १०० दिवस वाचन चळवळ’
दि. १७ डिसेंबर २०२५ ते दि. ३१ मार्च २०२६

WhatsApp Channel QR Code

---





## जिल्हा परिषदस्तरीय पेन्शन अदालत आता पंचायत समितीस्तरावरही

जिल्हा परिषद नाशिकच्या बहुद्देशीय सभागृहात जिल्हा परिषदस्तरीय पेन्शन अदालत यशस्वीपणे पार पडली असून 302 सेवानिवृत्ती प्रकरणांचा आढावा घेण्यात आला. सर्व प्रकरणांचा 15 जानेवारी 2026 पर्यंत अनिवार्य निपटारा करण्याचे निर्देश मुख्य कार्यकारी अधिकारी ओमकार पवार यांनी दिले तसेच विलंब झाल्यास शिस्तभंगात्मक कारवाईचा इशाराही दिला. पेन्शन प्रक्रिया गतिमान करण्यासाठी पुढील काळात पंचायत समितीस्तरावरही पेन्शन अदालत घेण्याचे निर्देश देण्यात आले.

TO READ MORE CLICK HERE

## ‘स्पेलिंग बी वर्ड बँक’ व लोगोचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या हस्ते अनावरण

जिल्हा परिषद नाशिकच्या शाळांमध्ये इंग्रजी भाषेवरील प्रभुत्व वाढविण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या ‘स्पेलिंग बी’ उपक्रमांतर्गत यंदा ‘स्पेलिंग बी वर्ड बँक’ तयार करण्यात आली आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी ओमकार पवार यांच्या संकल्पनेतून तयार झालेल्या या वर्ड बँकचे व स्पर्धेच्या अधिकृत लोगोचे आज अनावरण करण्यात आले. इयत्ता 1 ते 8 साठी स्तरनिहाय शब्दसंग्रह असलेली ही वर्ड बँक विद्यार्थ्यांच्या स्पेलिंग सरावासह इंग्रजी अध्यापनासाठी उपयुक्त ठरणार आहे.



## विनोबा ॲपमध्ये उत्कृष्ट काम करणाऱ्या शिक्षकांचा ‘पोस्ट ऑफ दी मंथ’ म्हणून गौरव

जिल्हा परिषद नाशिक शिक्षण विभागाच्या विनोबा ॲप या डिजिटल शिक्षण उपक्रमात उल्लेखनीय काम करणाऱ्या शिक्षकांचा ‘पोस्ट ऑफ दी मंथ’ म्हणून सन्मान करण्यात आला. ऑक्टोबर व नोव्हेंबर 2025 मध्ये नाविन्यपूर्ण अध्यापन, स्पेलिंग बी, वाचन व शैक्षणिक उपक्रम राबविणाऱ्या शिक्षकांचा मुख्य कार्यकारी अधिकारी ओमकार पवार यांच्या हस्ते गौरव झाला. यावेळी पवार यांनी विनोबा ॲपच्या माध्यमातून अधिकाधिक शिक्षकांनी आपले नाविन्यपूर्ण उपक्रम शेअर करण्याचे आवाहन केले.




## 'जीवन रक्षक हात' : संसर्गजन्य आजारांचा सामाजिक कलंक पुसून जिल्हा रुग्णालय नाशिकने जोपासली माणुसकी; शेकडो बाधित मातांची सुरक्षित प्रसूती



# Photo Gallery




स्वावलंबी नाशिक उपक्रम - इगतपुरी तालुक्यात ५२८ दिव्यांगांची नोंदणी पात्र

जिल्हा रुग्णालयात कर्मचायांसाठी ध्यान शिबिराचे आयोजन







जिल्हा परिषदेच्या नूतन वास्तूत आरोग्य विभागाची पहिली पदोन्नती प्रक्रिया

---